प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

भाषा भाग - २

इयत्ता ८ वी

विषय - संस्कृत : संपूर्ण / संयुक्त

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

भाषा भाग - २

इयत्ता ८ वी

विषय : संस्कृत : संपूर्ण / संयुक्त

अनुक्रमणिका

अ. क्र.		पृष्ठ क्र.
१.	प्रस्तावना	४१५
२.	उद्दिष्टे	४१६
३.	अभ्यासक्रमातील अपेक्षित घटक	४१६
४.	पाठ्यक्रम – इयत्ता आठवी	४१८
५.	मूल्यमापन निर्देश	४४५

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२

इयत्ता - ८ वी

विषय - संस्कृत : संपूर्ण / संयुक्त

१) प्रस्तावना

संस्कृत ही जगातील एक प्राचीन भाषा आहे. या भाषेत ऋग्वेदकाळापासून आजपर्यंत साहित्यनिर्मिती होत आहे. ज्ञान–विज्ञानाशी संबंधित वेगवेगळ्या क्षेत्रांमध्येही या भाषेत विपुल ग्रंथ लिहिले आहेत. भारतीय भाषांमध्ये संस्कृत शब्दांचा साठा विपुल आहे. म्हणून संस्कृत भाषेचे ज्ञान हे इतर भारतीय भाषा शिकण्यास पोषक ठरते.

संस्कृत भाषा व साहित्य राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने सुद्धा महत्त्वपूर्ण आहे. भारतात प्रादेशिक विषमता असली तरी ज्या तत्त्वांनी या देशाला एका सूत्रात बांधून ठेवले आहे, त्यात संस्कृत भाषा, तिचे साहित्य याचे महत्त्वाचे स्थान आहे. संस्कृत साहित्याने उत्तर–दक्षिण व पूर्व–पश्चिम हा भेदभाव नष्ट करण्यास मदत केली आहे. या भाषेत वेद, उपनिषदे, महाकाव्ये, नृत्य, नाट्य, गणित, आयुर्वेद, संगीत, चित्र व शिल्पकला इत्यादी ६२ विद्याशाखांतील साहित्य उपलब्ध आहे. पंचतंत्रासारख्या ग्रंथाचे जगातल्या ५० भाषांत भाषांतर झालेले आहे. मानवी मूल्ये आणि विश्वबंधुत्वाची भावना यांच्या विकासामध्ये संस्कृतचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

केवळ एक प्राचीन भाषा एवढेच संस्कृतचे महत्त्व नाही तर इतर भाषा शिकण्यात संस्कृत भाषा सहायक ठरते. संस्कृत भाषा ही आजच्या संगणक कार्यप्रणाली लेखनासाठी उपयुक्त असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. या भाषेचे अध्ययन व्यक्तिमत्त्व समृद्ध होण्यासाठी निश्चितपणे पोषक आहे.

२) उद्दिष्टे

सर्वसाधारण उद्दिष्टे

उच्च प्राथमिक स्तरावर संस्कृत भाषेच्या अध्ययन–अध्यापनासाठी खालीप्रमाणे सामान्य उद्दिष्टे आहेत.

(१) विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेचे प्राथमिक ज्ञान करून देणे.

(२) संस्कृत भाषा जाणीवपूर्वक ऐकणे, बोलणे, वाचणे व लिहिणे (श्रवण, भाषण, वाचन, लेखन) या क्षमता विकसित करणे.

(३) संस्कृत भाषा आणि साहित्याविषयी अभिरुची निर्माण करणे.

(४) नैतिक, सामाजिक व राष्ट्रीय मूल्ये रुजविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे. मानवी हक्क, पर्यावरण यांबद्दल कल्पना देणे.

(५) मातृभाषेतील तत्सम शब्दांची ओळख करून देणे.

विशिष्ट उद्दिष्टे

उच्च प्राथमिक स्तरावर खालीलप्रमाणे विशिष्ट उद्दिष्टे निर्धारित केली आहेत.

(१) संस्कृत ध्वनी म्हणजे वर्ण, पद यांचा शुद्ध उच्चार करण्याची योग्यता उत्पन्न करणे.

(२) सरल संस्कृतमध्ये वाक्य बोलण्याची व समजण्याची क्षमता विकसित करणे.

(३) अर्थबोधासह संस्कृत गद्य–पद्य वाचण्याची–शिकण्याची क्षमता विकसित करणे.

(४) संस्कृत स्त्रोत्रे, सुभाषिते यांचे आनंद, आस्वाद घेत लयबद्ध पठन करण्याची योग्यता वाढविणे

(५) सरळ संस्कृतात लिहिण्याची क्षमता वाढविणे.

(६) संस्कृत भाषा व संस्कृत साहित्याविषयी जिज्ञासा उत्पन्न करणे.

(७) पद्य–रचना चालीत म्हणून त्याचा रसास्वाद घेण्याची क्षमता विकसित करणे.

(८) विद्यार्थ्यांत सौंदर्यबोध, कल्पनाशक्ती आणि चिंतनाची क्षमता वाढविणे.

३) अभ्यासक्रमातील अपेक्षित घटक

निर्धारित ओळी	गद्य	पद्य
संयुक्त संस्कृत	७०	५०
संपूर्ण संस्कृत	१००	७०

१. संस्कृत वर्णमाला उच्चारांचे नियम

२. संस्कृत – लेखन – नियम – अक्षरविन्यास

३. शब्दसंग्रह

- ३.१ अ आ इ ई उ – कारांत नामे, सर्व विभक्ती
- ३.२ अस्मद्, युष्मद्, तद्, एतद्, किम्, – सर्वनामे
- ३.३ व्यवहारोपयोगी शब्द

४. क्रियापदे

- ४.१ वर्तमानकाळ गण, आदेश, सूत्र, परस्मैपद आणि आत्मनेपद रूपसिद्धी, प्रत्ययांचा परिचय, वचन
- ४.२ भूतकाळ
- ४.३ आज्ञार्थ
- ४.४ कृ/अस् इत्यादी धातूंची व्यवहारोपयोगी रूपे
- ४.५ उपसर्गांचा परिचय
- ४.६ विशेष उपयोग
  - ४.६.१ स्निह्
  - ४.६.२ रुच्
  - ४.६.२ दा इत्यादी.

५. वाक्यरचना

५.१ आठ विभक्तींचा परिचय

५.२ सहा कारकांचा परिचय

५.३ वाक्यात उपयोग

५.४ नवीन वाक्यरचना करणे

५.५ सोप्या संस्कृत वाक्यांचा अनुवाद करणे.

५.६ मराठी वाक्यांचा संस्कृत भाषेत अनुवाद

६. अव्यये

विशेष उपयोग

६.१ 'स्म'चा उपयोग

६.२ कालवाचक अव्यये – अद्य/श्वः/ह्यः/परश्वः/परह्यः

६.३ नित्योपयोगी अव्यये – अत्र, तत्र, कुत्र, सर्वत्र, पुरतः, पृष्ठतः, अभितः, परितः, आम्, खलु, यदा–तदा

६.४ विशिष्ट विभक्ती अपेक्षा – सह, विना, ऋते, अलम्

७. कालगणना

७.१ घड्याळ – १ ते १२ वाजेपर्यंत
सपाद, सार्ध, पादोन

८. संख्या

८.१ १ ते ५०

८.२ १ ते ४ लिंगभेद

९. संधी

९.१ स्वरसंधी/विसर्ग संधी परिचय

९.२ सवर्ण दीर्घ संधी, गुणसंधी, वृद्धी संधी

१०. विशेषण–विशेष्य संबंध

११. अपठित

११.१ गद्य उतारे

११.२ पद्य उतारे

* * *

पाठ्यक्रम

विषय – संस्कृत

भाषा कौशल्य – श्रवण

इयत्ता आठवी

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
१) वर्णमाला	स्वर – १३ व्यंजन – ३३ १) मराठीत नसलेले परंतु संस्कृतमध्ये असलेले वर्ण उदा. – ऋ, लृ	वर्गखोली	तक्ता फ्लॅश कार्ड	मराठीत नसलेले परंतु संस्कृतमध्ये असलेले वर्ण समजावून घेतो.	**उपक्रम–** १) नाव, गाव, फळ, फूल, वर्णानुसार सांगतो.
	२) मराठीत आहेत परंतु संस्कृतमध्ये नसलेले वर्ण लक्षात आणून देणे. उदा. – क्ष, ज्ञ, ल, ळ (वरील वर्णांपैकी क्ष, ज्ञ, ही जोडाक्षरे आहेत.)	वर्गखोली	तरंगचित्र	मराठीत आहेत, परंतु संस्कृतमध्ये नसलेले वर्ण लक्षात घेतो. क्ष, ज्ञ हे वर्ण जोडाक्षर आहेत हे समजावून घेतो. लक्षपूर्वक श्रवण करतो.	२)अंत्याक्षरापासून नवीन शब्द सांगणे उदा. गावाचे नाव नगर – राहुरी, रहिमतपूर, राजापूर, रावळगाव, वडगाव
	३) वर्णमालेतील स, श्, ष यांच्या उच्चारणांतील भेद समजावून देणे. उदा. – स – संगणक श – शाळा ष – षटकोन	वर्गखोली	रंगीत चित्रे सीडी	वर्णमालेतील स, श, ष यांच्या उच्चारणांतील भेद समजावून घेतो. लक्षपूर्वक श्रवण करतो.	**तोंडीकाम –** वर्णमाला तक्ता वाचन

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
	४) मृदू व्यंजन, कठोर व्यंजन व अनुनासिकांची संकल्पना समजावून देणे. उदा. क, च, ट, त, प वर्ग संकल्पना	संस्कृत कोपरा	वर्णमालेचा सचित्र तक्ता	मृदू, कठोर व अनुनासिकांची संकल्पना समजावून घेतो. शुद्ध उच्चारणासह श्रवण करतो.	**प्रकल्प** क, च, ट, त, प यांचा तक्ता तयार करणे.
	५) परसवर्ण व अनुनासिक विशेष भर देणे. अनुनासिक – घंटा → घण्टा → परसवर्ण	वर्गखोली	सीडी वर्णमाला तक्ता	परसवर्ण व अनुनासिकांचा शुद्ध उच्चारणांसह श्रवण करतो.	**प्रकल्प** तत्सम व तद्भव शब्दांची यादी करा.
२) शब्दसंग्रह	१) तत्सम व तद्भव शब्दांचा परिचय करून देणे. संस्कृत भाषेचे साम्य समजावून सांगणे. तत्सम शब्द – परीक्षा, परिचय, गृह, वृक्ष, मयूर तद्भव शब्द – मोर, चोर, सोनं,	संस्कृत कोपरा घर	तक्ता फ्लॅश कार्ड, तरंग कार्ड	तत्सम व तद्भव शब्दांचा परिचय करून घेतो. शुद्ध उच्चारणांसह संस्कृतभाषेचे साम्य समजावून घेतो.	**प्रकल्प** पाठातील अनुनासिक शब्दांची यादी करून शब्दांचे परसवर्णात रूपांतर करा.
	२) लिंग वचनाचा निर्देश उदा. शब्द लिंग वचन राम पुल्लिंग एकवचन	संस्कृत कोपरा	तक्ता सीडी	शब्दाचे लिंग, वचन समजावून घेतो.	**तोंडीकाम** लिंग, वचन, तक्ता वाचन

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
	३) नाम व सर्वनामांचा संभाषणात्मक बोध करून देणे. उदा. तद्, यद्, एतद्, किम्, अस्मद्, युष्मद् – सर्वनामांचा सर्व विभक्तींसह परिचय	शाळा वर्गखोली	–	नाम व सर्वनामांचे संभाषणात्मक शुद्ध उच्चारणासह श्रवण करतो.	–
३) क्रियापदे	१) प्रचलित व्यवहारोपयोगी मातृभाषेला जवळच्या क्रियापदांची सिद्धरूपे उदा. सह वाचन व उच्चारण सराव. (शुद्ध श्रवण करून द्यावे.) २) परस्मैपदी व आत्मनेपदी प्रत्ययांचा संबंध सांगणे. ३) क्रियापदाच्या पुरुष व वचनांचा संबंध यावा. उदा.–अहं गच्छामि । त्वं गच्छसि । ४) सतत वापरात येणारे काही सिद्ध रूपांतील धातू अस्ति – सन्ति भवति – भवन्ति करोति – कुर्वन्ति	वर्गखोली घर घर	– क्रियापदांच्या सिद्धरूपांचा तक्ता, परस्मैपदी व आत्मनेपदाच्या प्रत्ययांचा तक्ता	अभिनय चित्रे व तक्ते यांचा वापर करून स्वतः वाक्ये तयार करतो (तोंडी) (शुद्ध श्रवण) वर्तमानकाळातील, भविष्यकाळी सिद्ध क्रियापदांची रूपे लक्षपूर्वक ऐकतो.	**प्रश्नोत्तरे** तोंडी **गटकार्य** क्रियापदांचा स्वतःहून उत्साहाने परिचय करून घेतो.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
३) क्रियापदे	५) आज्ञार्थ क्रियापदे परिचय ६) उपसर्गांचा परिचय प्रतिवर्षम्, यथाशक्ति, अनुरूपम् ७) उपसर्ग लावून क्रियापदांचा वाक्यात उपयोग उदा. अहं, श्रीगणेशं प्रणमामि । अहं गृहं प्रतिगच्छामि ।	शाळा वर्गखोली	–	आज्ञार्थ/क्रियापदांनुसार, लक्षपूर्वक ऐकून कृती करतो. उपसर्गांचा वाक्यांत योग्य उपयोग करतो.	शिक्षक सूचना करतील त्याप्रमाणे सर्व विद्यार्थी कृती करतात. उदा. गच्छ – आगच्छ – अनुगच्छ धातूंचा सराव हरति – विहरति प्रहरति – संहरति
४)वाक्यरचना	१) सर्व विभक्तींचा वापर असलेल्या वर्तमान, भविष्य व आज्ञार्थ वाक्यरचनांचे अर्थपूर्ण श्रवण करवून देणे. २) सर्व कारकांचा परिचय करवून देणे. ३) सोप्या संस्कृत वाक्यांचे शुद्ध श्रवण करवून देणे. ४) भूतकाळी रूपे तयार होताना प्रत्ययांबरोबरच 'अ' हा आगम लागतो.	वर्ग –	फ्लॅश कार्ड, तक्ते सीडी	सर्व विभक्तींचा वापर असलेली वाक्ये लक्ष देऊन ऐकतो व नवीन क्रियापद दिले असता वाक्य बनवतो. सोप्या संस्कृत वाक्यांचे शुद्ध श्रवण करतो.	**उपक्रम–** क्रियापद देऊन एक एक शब्द वाढवून वाक्य बनविणे.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
५) संख्या	१ ते ५०– अंकी व अक्षरी श्रवण व वाचन. पाठ्यपुस्तकाचे पाठ क्रमांक व पृष्ठक्रमांकाचे वाचन व श्रवण १ ते ४ – लिंग भेद उदा. एकः बालकः । एका बालिका । एकं वाहनम् । (अर्थपूर्ण श्रवण करवणे.)	वर्ग संस्कृत कोपरा	तक्ता तक्ता	१ ते ५० संख्या अंकी व अक्षरी समजून श्रवण करतो. १ ते ४ अंकांचे लिंग भेदानुसार वाक्यांचे अर्थपूर्ण श्रवण करतो.	**उपक्रम–** १ ते ५० अंक क्रमाने उच्चारणे. **गटकार्य** १ ते ५० अंकांचा तक्ता तयार करा. **तोंडीकाम–** १ ते ४ लिंग भेदानुसार सोपी वाक्ये सांगा.
६)कालगणना	१ ते १२ – घड्याळी अंक (वेळ) यांचे अर्थपूर्ण श्रवण करवून देणे. सपाद, सार्ध, पादोन यांचा अर्थ स्पष्ट करून देणे.	वर्ग –	घड्याळ	१ ते १२ घड्याळी अंकाचे (वेळ) अर्थपूर्ण श्रवण करतील. १ ते १२ अंक व घड्याळी अंक यांतील उच्चारणातील भेद समजावून घेतील.	**दिनचर्येचे तोंडी वाचन** अर्थपूर्ण श्रवण

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
७) संधी	१) स्वरसंधी विविध उदाहरणांद्वारे स्वरसंधी स्पष्ट करणे. उदा. देव + आलय = देवालय २) सवर्णदीर्घ संधी– उदा. गिरि + ईश = गिरीश भानु + उदय = भानूदय गुण, वृद्धी, यण् संधीची उदाहरणे द्यावीत.	संस्कृत कोपरा	शब्दपट्टी	फलकावरील स्वरसंधी व सवर्णदीर्घ संधींची उदा. व विग्रह लक्षपूर्वक पाहतो व अर्थपूर्ण श्रवण करतो.	पाठातील संधी शोधा व विग्रह करा.
८) विशेषण–विशेष्य संबंध	लिंग, वचन, विभक्तीनुसार साम्य, भेद समजावून देणे.	वर्ग –	वाक्यपट्टी	वाक्यातील लिंग, वचन, विभक्तीची माहिती जाणीवपूर्वक ऐकतो व वाक्यातील विशेष्य व विशेषण संबंध ओळखतो.	विविध लिंग वचनाच्या विशेषणांची यादी करा व त्यांची वाक्ये बनवा. **तोंडी काम** प्रश्नोत्तरे अनुवाद समानार्थी शब्द

टीप – विद्यार्थ्यांचे श्रवण कौशल्य विकसित करण्यासाठी पाठ्यपुस्तकाबाहेरील गद्य व पद्य उताऱ्यांचे अर्थपूर्ण व शुद्ध श्रवण करवून देणे.

भाषा कौशल्य – भाषण – संभाषण					
घटक	**कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव**	**भाषा व्यवहाराची क्षेत्रे**	**साधन सामग्री**	**व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती**	**निरंतर मूल्यमापन**
१) वर्णमाला	१) वर्णमालेतील वर्णाक्षराने सुरू होणारे विविध गटांशी संबंधित असलेले शब्द तयार करून गटांनुसार शाब्दिक चर्चा उदा. – वर्गातील वस्तू, दप्तरातील वस्तू, स्वयंपाकघरातील वस्तू	वर्ग घर	तक्ता	वर्णमालेतील वर्णाक्षरांनी सुरू होणारे विविध गटांशी संबंधित असलेले शब्द तयार करून त्यानुसार चर्चेत सहभागी होतो.	**गटचर्चा** **उपक्रम–** शब्द तयार करा.
	२) व्याकरणदृष्ट्या शुद्ध शब्द तयार करून घेणे व चर्चा घडवून आणणे.	वर्ग		व्याकरणदृष्ट्या शुद्ध शब्द तयार करून चर्चेत सहभागी होतो.	**गटचर्चा** **उपक्रम –** ऱ्हस्व, दीर्घ नियमानुसार शब्द तयार करणे.
	३) जोडाक्षरे, अनुस्वार, विसर्गयुक्त शब्दांच्या उच्चारांची चर्चा (परसवर्णानुसार चर्चा)	वर्ग		जोडाक्षरे, अनुस्वार, विसर्गयुक्त शब्दांच्या उच्चारांबाबत चर्चेत सहभागी होतो.	**तोंडीकाम**
	४) शब्दांची स्वर व व्यंजनानुसार फोड करून त्यावर चर्चा प्र = प् + (र्) + (अ) आशीर्वाद = आ + श् + ई + र् + व् + आ + द् + अ	संस्कृत कोपरा		शब्दांची स्वर व व्यंजनानुसार फोड करून सांगतो.	**तोंडीकाम** **उपक्रम**

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
२) शब्दसंग्रह	१) अनुस्वारयुक्त शब्दांचे परसवर्णानुसार शुद्ध उच्चारण व त्यानुसार छोटी वाक्ये तोंडी तयार करवून घेणे. (चर्चा)	वर्ग	वाक्यपट्टी	अनुस्वारयुक्त शब्दांचे परसवर्णानुसार शुद्ध उच्चारण करतो व छोटी वाक्ये तयार करतो. (चर्चा)	**उपक्रम–** छोटी वाक्ये तयार करा.
	२) अ, आ, इ, ई कारान्त पु., स्त्री, नपु. नामे व सर्वनामे यांच्या तक्त्यांचे वाचन व त्यातील रूपांच्या बदलांबाबत माहिती करवून देणे व चर्चा घडवून आणणे.	संस्कृत कोपरा	तक्ता	तक्त्यांचे पठन करतो व रूपांच्या बदलाबाबत माहिती करून घेतो. चर्चेत सहभागी होतो.	**प्रकल्प –** तक्ता तयार करा.
	३) तद्भव शब्दांच्या मराठी व संस्कृत लेखनांतील फरक लक्षात आणून देणे व चर्चा उदा. कवि – कवी	वर्ग	तक्ता	तद्भव शब्दांच्या मराठी व संस्कृत लेखनातील फरक लक्षात घेतो व चर्चेत सहभागी होतो.	**प्रकल्प –** तक्ता तयार करा.
३) क्रियापद	१) १, ४, ६, १० गणांच्या धातूंना परस्मैपदी व आत्मनेपदी प्रत्यय लावून सिद्ध रूपांची वचन व पुरुषानुसार चर्चा घडवून आणणे व धातूंचा उपयोग समजावून देणे. २) गणविकरण अंग व प्रत्यय या संकल्पनांबाबत चर्चा घडवून आणणे.	वर्ग	–	१, ४, ६, १० गणाच्या धातूंना परस्मैपदी व आत्मनेपदी प्रत्यय लावून सिद्ध रूपांची वचन पुरुषानुसार ओळख करून घेतो व चर्चेत सहभागी होतो व धातूंचा उपयोग समजावून घेतो. गणविकरण, अंग व प्रत्यय या संकल्पनांबाबत चर्चेत सहभागी होतो.	**गटकार्य** **तोंडीकाम**

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
	३) वर्तमानकाळ, भूतकाळ व निवडक आज्ञार्थी रूपे यांच्या सिद्धरूपांच्या वाक्यांतील उपयोगावर चर्चा घडवून आणणे. उदा. – वर्तमानकाळ – पिबति भूतकाळ – अपिबत् आज्ञार्थ – पिबतु	वर्ग	–	वर्तमानकाळ, भूतकाळ व निवडक आज्ञार्थी रूपे यांच्या सिद्धरूपांच्या वाक्यांतील उपयोगावर चर्चेत सहभागी होतो.	प्रकल्प
	४) धातूला विविध उपसर्ग लावून होणारे बदल – चर्चा घडवून आणणे. उदा. हर् – हरति सं + हरति, अप + हरति, वि + हरति, परि + हरति अर्थानुसार विश्लेषण करणे.			धातूला विविध उपसर्ग लावून होणारे बदल समजावून घेतो.	उपक्रम
४) अव्यय	१) अव्यय संकल्पना समजावून देऊन निर्धारित अव्ययांची विविध उदाहरणे तयार करवून घेणे. उदा. – स्थलवाचक, कालवाचक	वर्ग	तक्ता	अव्यय संकल्पना समजावून घेऊन निर्धारित अव्ययांची विविध उदाहरणे तोंडी देतो.	**उपक्रम**
	२) अव्ययांचा अर्थ समजावून देणे.			अव्ययांचा अर्थ समजावून घेतो व वाक्ये तयार करतो. अव्ययांचा अर्थ सांगतो.	

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
५)वाक्यरचना	१) सर्व विभक्तींचा वापर असलेल्या वर्तमानकाळ, भविष्यकाळ व आज्ञार्थी वाक्यरचना गटांनुसार तयार करवून घेणे. (चर्चा)	वर्ग	तक्ता	गटानुसार वाक्यरचना तयार करतो.	तोंडी काम चित्रवर्णन करा.
	२) सर्व विभक्तींचा कारकांचा परिचय करवून देणे व जास्तीत जास्त विभक्तींचा वापर करून वाक्ये तयार करवून घेणे. (चर्चा)			वाक्ये तयार करतो.	तोंडीकाम वाक्य तयार करा.
	३) उपपद विभक्तींचा वापर करून विद्यार्थ्यांकडून वाक्यरचना तयार करून त्यावर चर्चा घडविणे.	वर्ग	तक्ता	उपपद विभक्तींचा वापर करून विद्यार्थी वाक्य तयार करतो.	तोंडीकाम
	४) वाक्यरचनेच्या तत्त्वांनुसार दिलेल्या चित्राचे वर्णन/एखाद्या विषयावर ५-१० वाक्ये बोलणे.	संस्कृत कोपरा	चित्र	दिलेल्या चित्राचे वर्णन करतो.	उपक्रम
	५) संस्कृतमधील नियम-चर्चा घडवून आणणे. उदा. पूर्णविराम . । घंटा - घंटा/घण्टा	वर्ग	तक्ता	संस्कृतमधील नियम-चर्चा करतात व समजावून घेतात.	उपक्रम

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
	६) वाक्यातील हलन्त या संकल्पनेवर चर्चा घडवून आणणे व नियम उदाहरणाने सांगणे.	वर्ग	तक्ता	वाक्यातील हलन्त ही संकल्पना समजावून घेऊन उदाहरणे सांगतो.	**तोंडी काम**
	७) क्रियापदांची (१, ४, ६, १०) रूपे, परस्मैपदी व आत्मनेपदी, नाम व सर्वनामांच्या योग्य त्या रूपांनुसार तसेच वर्तमानकाळी व भूतकाळी योग्य रूपांनुसार सिद्धरूपांवर चर्चा.			क्रियापदांची रूपे, नाम व सर्वनामांच्या योग्य त्या रूपानुसार वर्तमानकाळी व भूतकाळी योग्य रूपांनुसार सिद्धरूपावर चर्चेत सहभागी होतात.	
	८) व्यवहारोपयोगी आज्ञार्थी सिद्धरूपांवर चर्चा घडविणे व छोटी छोटी वाक्ये तयार करवून घेणे.	वर्ग		व्यवहारोपयोगी आज्ञार्थी सिद्धरूपांवर चर्चा – सहभागी होतात. छोटीछोटी वाक्ये तयार करतात.	
	९) या, अस्, कृ धातूंची व्यवहारोपयोगी सिद्धरूपे बनविण्यास शिकवणे व त्यांचे वर्तमानकाळ, भूतकाळ, आज्ञार्थ रूपांमध्ये रूपांतर करण्यास शिकविणे/समजावून देणे.			सिद्धरूपे बनवतात व रूपांतर करतात.	
	१०) सिद्धरूपांचा छोट्या वाक्यांत उपयोग करून दाखविणे व करवून घेणे. (तोंडी)			सिद्धरूपांवर आधारित छोटी वाक्ये तयार करतात. (तोंडी)	

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
५)वाक्यरचना (अनुवाद)	१) पाठातील संस्कृत वाक्यांचा माध्यम भाषेत तोंडी अनुवाद करवून घेणे.	वर्ग	वाक्यपट्टी	पाठातील संस्कृत वाक्यांचा माध्यम भाषेत तोंडी अनुवाद करतात.	**उपक्रम** दिलेल्या वाक्याचा अनुवाद करा. (पाठातील)
	२) ध्येयवाक्य, बोधवाक्य, सुभाषितवजा पद्यांश, सोपे श्लोक यांचा क्रमाने माध्यम भाषेत अनुवाद करवून घेणे.	वर्ग	वाक्यपट्टी श्लोकपट्टी	ध्येयवाक्य, बोधवाक्य, सुभाषितवजा पद्यांश, सोपे श्लोक यांचा क्रमाने माध्यम भाषेत अनुवाद करतात.	**उपक्रम** दिलेल्या वाक्याचा अनुवाद करा. (पाठाव्यतिरिक्त)
	३) मराठी वाक्यांचा संस्कृत वाक्यांमध्ये अनुवाद करण्यास साहाय्य करणे.	वर्ग घर	वाक्यपट्टी		**गटकार्य** अनुवाद करा. (गाभा घटकांनुसार उतारे निवडावेत. नीतितत्त्वानुसार श्लोक निवडावेत. संस्कृत प्रार्थना निवडावी.)
(संस्कृतमध्ये अनुवाद करताना संस्कृत भाषेच्या शैलीनुसार क्रियापदे व अव्यये यांच्या विशिष्ट अपेक्षा लक्षात घेऊन व्याकरणशुद्ध अनुवादाचा सराव करवून घेणे.)					
६)कालगणना	१) १ ते १२ अंक – सचित्र देऊन त्यानुसार वर्गात चर्चा घडवून आणणे.	वर्ग	चित्रे	१ ते १२ अंक– सचित्र पाहून त्यावर वाक्ये तयार करतात. चर्चेत सहभागी होतात.	**उपक्रम** दिनचर्या सांगा.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
७) संख्या	१ ते ५० अंक (१ ते ४) लिंगभेदासह) उदाहरणे देणे व चर्चा घडवून आणणे.	संस्कृत कोपरा	तक्ता	१ ते ५० अंक उदाहरणाने समजावून घेतात. चर्चेत सहभागी होतात.	**उपक्रम** संख्या अक्षरात सांगा. संख्या असलेली वाक्ये सांगा.
८) संधी	पाठातील स्वरसंधीचे नियम सांगून उदाहरणांसह चर्चा घडवून आणणे.	–	तक्ता	पाठातील स्वरसंधीचे नियम समजावून घेतात.	**प्रकल्प–** पाठातील स्वरसंधी उदाहरणे शोधा.
९) विशेषण – विशेष्य	१) विशेषण – विशेष्य यांच्या जोडीने छोटी वाक्ये तयार करवून घेणे. २) विशेषण–विशेष्य यांच्या योग्य लिंग, वचन, विभक्तीनुसार वाक्यांत उपयोग करण्यास साहाय्य करणे.	वर्ग वर्ग	शब्दपट्टी	विशेषण–विशेष्य यांच्या जोडीने छोटी वाक्ये तयार करतात. विशेषण–विशेष्य यांच्या योग्य लिंग, वचन, विभक्तीनुसार वाक्यांत उपयोग करतात.	**उपक्रम** दिलेल्या विषयावर ५ ओळी माहिती सांगा. **प्रकल्प–** विशेषण–विशेष्य वाक्यांत उपयोग करा.
१०) अपठित गद्य व पद्य (आकलन)	विद्यार्थी वयोगट, क्षमता, गाभाघटक, जीवनकौशल्ये यांवर आधारित उतारे निवडून त्यांचे वाचन करणे व संवादाचे नाट्यीकरण व चर्चा घडवून आणणे. पद्य उताऱ्यांचा सोप्या संस्कृतमध्ये अनुवाद करवून घेणे.	वर्ग	–	विद्यार्थी वयोगट, क्षमता, गाभाघटक, जीवनकौशल्ये यांवर आधारित उताऱ्यांचे वाचन करतात व संवादाचे नाट्यीकरण करतात व चर्चेत सहभागी होतात. पद्य उताऱ्यांचा सोप्या संस्कृतमध्ये अनुवाद करतात.	**गटकार्य–** अपठित उतारे चर्चा अपठित पद्य उताऱ्याचा अनुवाद करा.

भाषा कौशल्य – वाचन

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
१) वर्णमाला	१) सर्व वर्णमालेचे शुद्ध उच्चारण परसवर्णानुसार शुद्ध उच्चारांचे वाचन करवून घेणे.	वर्ग	तक्ता सीडी	परसवर्णानुसार शुद्ध उच्चारांचे वाचन करतात. वर्णमालेचे शुद्ध वाचन/उच्चारण करतात.	**तोंडीकाम–** वर्णमाला वाचन अनुवाचन
	२) उच्चारणस्थानांची संकल्पना समजावून सांगणे व प्रत्यक्ष उच्चारणाद्वारे स्पष्ट करणे.	वर्ग	तक्ता	उच्चारणस्थानांची संकल्पना समजावून घेतात व प्रत्यक्ष शुद्ध/उच्चारण/वाचन करतात.	**उपक्रम–** क, च, ट, त, प वर्गानुसार वाचन करा.
	३) व्यवहारोपयोगी सोप्या संस्कृत शब्दांचा परिचय करवून देऊन वाचन करवून घेणे.	संस्कृत कोपरा	शब्दपट्ट्या	व्यवहारोपयोगी सोप्या संस्कृत शब्दाचे शुद्ध वाचन करतात.	**प्रकल्प–** प्रत्येक अक्षरांवरून तयार होणारे शब्द लिहा व त्याचे वाचन करा. (पाठातील)
	४) विसर्गाचा योग्य तऱ्हेने उच्चार करून घेणे.	संस्कृत कोपरा वर्ग		विसर्गाचा योग्य तऱ्हेने उच्चार करतात.	
	५) ऱ्हस्व व दीर्घ स्वरातील भेद समजावून देऊन शुद्ध वाचन करवून घेणे.	संस्कृत कोपरा वर्ग	अक्षरपट्टी	ऱ्हस्व व दीर्घ स्वरांतील भेद समजावून घेऊन शुद्ध वाचन करतात.	**स्वाध्याय–** वर्णमाला कंठस्थ करा.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
२) शब्दसंग्रह	१) जोडाक्षरयुक्त शब्दांचे शुद्ध वाचन करवून घेणे. (अनुवाचन) २) अ, आ, इ, ई, उ – कारान्त, नामांचा परिचय, सर्व विभक्त्यांमध्ये तक्ता वाचन करवून घेणे. ३) अस्मद्, युष्मद्, तत्, एतद्, किम् सर्वनामांचे शुद्ध वाचन करवून घेतील. ४) व्यवहारोपयोगी शब्दांचे शुद्ध वाचन करवून घेणे.	संस्कृत कोपरा	तक्ता	जोडाक्षरयुक्त शब्दांचे शुद्ध वाचन करतो. अ, आ, इ, ई, उ – कारान्त, नामांचा परिचय, सर्व विभक्त्यांमध्ये तक्ता वाचन करतो. अस्मद्, युष्मद्, तत्, एतद्, किम् सर्वनामांचे शुद्ध वाचन करतात. व्यवहारोपयोगी शब्दांचे शुद्ध वाचन करतात.	**तोंडीकाम–** १) जोडाक्षरयुक्त शब्दांचे वाचन २) विभक्यांचा तक्ता वाचन ३) सर्वनामाचा तक्ता वाचन ४) व्यवहारोपयोगी शब्दांचे शुद्ध वाचन
३) क्रियापद	१) क्रियापदांचे वर्तमानकाळ, भूतकाळ तक्ता वाचन करवून घेणे. २) आज्ञार्थ व्यवहारोपयोगी सिद्धरूपांचे वाचन करवून घेणे. ३) उपसर्ग लागल्यामुळे क्रियापदाच्या रूपांत होणारा बदल समजावून देऊन शुद्ध वाचन करणे व विद्यार्थ्यांकडून करवून घेणे.	वर्ग वर्ग वर्ग	तक्ता तक्ता तक्ता	क्रियापदांचे वर्तमानकाळ, भूतकाळ तक्त्यांचे वाचन करतात. आज्ञार्थ व्यवहारोपयोगी सिद्धरूपांचे वाचन करतात. उपसर्ग लागल्यामुळे क्रियापदाच्या रूपांत होणारा बदल समजावून घेतात व त्याप्रमाणे शुद्ध वाचन करतात.	**उपक्रम–** शिक्षक/विद्यार्थी गट कृती करतील. त्याप्रमाणे अन्य विद्यार्थी/गट क्रियापद सांगतील.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
४)वाक्यरचना	१) क्रियापद विरहित सोपी वाक्यरचना देऊन वाचन करवून घेणे. अहं बालः । सः छात्रः ।	वर्ग	शब्दपट्टी	क्रियापद विरहित सोपी वाक्ये वाचन करतात.	**प्रकल्प–** १) श्लोक व सुभाषतिसंग्रह करा व वर्गात वाचन करा.
	२) आठ विभक्ती व सहा कारकांचा परिचय देऊन शुद्ध वाचन करवून घेणे.		वाक्यपट्टी	विभक्ती व कारकांनुसार वाक्यांचे वाचन करतात.	
	३) गद्य पाठाचे आशयानुरूप योग्य विरामचिन्हांचा उपयोग करून आरोह–अवरोहांसह शिक्षकांनी स्वतः वाचन करणे व विद्यार्थ्यांकडून वाचन करवून घेणे.	वर्ग	अपठित गद्यपाठ (उतारा)	गद्य पाठाचे आशयानुरूप योग्य विरामचिन्हांचा उपयोग करून आरोह–अवरोहांसह वाचन करतात.	
	४) पद्यांशाचे वाचन करताना वृत्त तथा छंदानुरूप योग्य चालीत स्वतः वाचन करणे व विद्यार्थ्यांकडून वाचन करवून घेणे.	वर्ग	सीडी	पद्यांशाचे वाचन करताना वृत्त तथा छंदानुरूप योग्य चालीत वाचन करतात.	
५) अव्यय	आम् , वा, न, अद्य, श्वः, परश्वः, पुरतः, पृष्ठतः, उपरि, अधः, अत्र, तत्र या अव्ययांचा सोप्या वाक्यांत उपयोग समजावून सांगणे व त्याचे शुद्ध वाचन करवून घेणे.	वर्ग	तक्ता	अव्ययुक्त वाक्यांचे वाचन करतात.	**तोंडीकाम–** अव्ययुक्त वाक्यांचे वाचन करा.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
६)कालगणना	१) १ ते १२ अंक– चित्राद्वारे कालगणनेचे शिक्षकांनी स्वतः वाचन करणे व विद्यार्थ्यांकडून करवून घेणे.	संस्कृत कोपरा	दिनचर्या (चित्ररूपात)	चित्राद्वारे कालगणनेचे वाचन करतात.	**उपक्रम–** शालेय वेळापत्रक लिहा व वाचन करा.
७) संख्या	१) १ ते ५० संख्या अंकी व अक्षरी वाचन करवून घेणे. २) १ ते ४ लिंगभेद– लिंगभेदासह वाचन करवून घेणे.	संस्कृत कोपरा	तक्ता	१ ते ५० संख्यांचे अंकी व अक्षरी अचूक वाचन करतात. लिंगभेदासह वाचन करतात.	**तोंडीकाम–** १ ते ५० संख्यांचे वाचन. उपक्रम– १) १ ते ५० अंक उलट क्रमाने म्हणा/वाचा. २) सम व विषम संख्या ओळखा व वाचा. ३) सम व विषम संख्यांचा तक्ता अंकी–अक्षरी लिहा.
८) संधी	पाठातील स्वरसंधी तोंडी सोडवून त्याचे वाचन करवून घेणे.	वर्ग	तक्ता	पाठांतील स्वरसंधी तोंडी सोडवून त्याचे वाचन करतात.	**उपक्रम–** तक्त्यातील उदाहरणाचा संधी करून वाचा.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
९) विशेषण–विशेष्य संबंध	१) विशेषण व विशेष्य यांच्या जोडीने तक्त्याचे वाचन करवून घेणे. उदाहरण– चतुरः बालकः । चतुरौ बालकौ । चतुराः बालकाः । वरीलप्रमाणे सर्व विभक्ती व वचनाप्रमाणे तक्त्याच्या आधारे वाचून घेणे. (अ, इ, उ – कारान्त नामे व विशेषणे यांच्या संयोगाने वैविध्यपूर्ण अभ्यास देणे.) उदा. चतुरः कविः	वर्ग	तक्ता	विशेषण व विशेष्य यांच्या जोडीने तक्त्याचे वाचन करतात.	**तोंडीकाम** तक्ता वाचन

भाषा कौशल्य – लेखन

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
१) वर्णमाला	१) वर्णमालेतील सर्व वर्ण योग्य पद्धतीने लेखन, अनुलेखन, श्रुतलेखन करवून घेणे.	संस्कृत कोपरा	तक्ता	वर्णमालेतील सर्व वर्ण योग्य पद्धतीने लेखन, अनुलेखन, श्रुतलेखन करतो.	–अनुलेखन –श्रुतलेखन –वर्णमालेचा तक्ता पूर्ण करा.
	२) ऱ्हस्व व दीर्घ उच्चारांचे नीट श्रवण करून त्याप्रमाणे लेखन करणे.	संस्कृत कोपरा	सीडी	ऱ्हस्व व दीर्घ उच्चारांचे नीट श्रवण करून त्याप्रमाणे लेखन करतो.	–वर्गानुसार लेखन करा.
	३) जोडाक्षरे, अनुस्वार व विसर्गयुक्त शब्दांचे लेखन करवून घेणे.	वर्ग	तक्ता	जोडाक्षरे, अनुस्वार व विसर्गयुक्त शब्दांचे लेखन करतो.	**उपक्रम–** –वर्गातील वस्तूंची नावे, फोड करा. (स्वतःचे नाव, व्यवहारोपयोगी वस्तू, स्वयंपाकघरातील वस्तू)
तृ–त्+ऋ त्रु–त्+रु क्र–क्+र कृ–क्+ऋ	४) शब्दांची स्वर व व्यंजनानुसार फोड करून दाखविणे व लेखन करवून घेणे.		शब्दपट्टी	शब्दांची स्वर व व्यंजनानुसार फोड करून लिहितो.	
	५) रफारयुक्त शब्दांचे शुद्ध लेखन करवून घेणे.			रफारयुक्त शब्दांचे शुद्ध लेखन करतो.	–वर्ण संयोजनाने शब्द तयार करा.
२) शब्दसंग्रह	१) तद्भव शब्दांच्या मराठी व संस्कृत लेखनात बदल असल्यास संस्कृतमध्ये योग्य प्रकारे लेखन करवून घेणे. उदा. मराठी – शब्द, कवी, गणपती, ब्राम्हण संस्कृत – शब्द, कविः, गणपतिः, ब्राह्मण	वर्ग संस्कृत कोपरा	शब्दपट्टी	तद्भव शब्दांच्या मराठी व संस्कृत लेखनात बदल असल्यास संस्कृतमध्ये योग्य प्रकारे लेखन करतो.	**उपक्रम–** १) तद्भव शब्दांची यादी करा.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
२) शब्दसंग्रह	२) अनुस्वारयुक्त शब्दांचे परसवर्णाप्रमाणे लेखन करवून घेणे. उदा. घंटा – घण्टा (क, च, ट, त, प – वर्गानुसार)	वर्ग	तक्ता	अनुस्वारयुक्त शब्दांचे परसवर्णाप्रमाणे लेखन करतो.	प्रत्येक वर्गात प्रत्येक वर्णाचे किमान दोन अनुस्वारयुक्त शब्द लिहून त्याचे परसवर्णानुसार लेखन करा.
	३) अ, इ, उ कारान्त नामे व सर्वनामे यांचे तक्ते पाठ करवून लेखन करवून घेणे.		तकता	अ, इ, उ कारान्त नामे व सर्वनामे यांचे तक्ते लेखन करतो.	तक्ता पूर्ण करा.
३) क्रियापद	१) धातूपासून गणविकरण चिन्हांसह प्रत्यय लावून परस्मैपदी व आत्मनेपदी सिद्ध क्रियापदे बनविण्याची पद्धत समजावून देणे व त्याप्रमाणे लेखन करवून घेणे.	वर्ग	तक्ता	धातूपासून क्रियापदांचे रूप सूत्ररूपात लिहितो व स्वतः तयार करतो.	(१, ४, ६, १०) गणांच्या परस्मैपदी व आत्मनेपदी क्रियापदांची सूत्रे लिहितो.
	२) आदेश, अंग व प्रत्यय या संकल्पना समजावून देणे.	वर्ग			
	३) गण व गणांची विकरण चिन्हे, पदसंकल्पना समजावून देणे.				

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
३) क्रियापद	४) वर्तमानकाळ, भूतकाळ, निवडक आज्ञार्थ रूपे पाठ करून शुद्ध लेखन करवून घेणे. ५) धातूला विविध उपसर्ग लावून होणारे बदल समजावणे व त्याप्रमाणे लेखन करवून घेणे.	वर्ग	तक्ता तकता	वर्तमानकाळ,भूतकाळ निवडक आज्ञार्थ रूपे पाठ करून लेखन करतो. धातूला विविध उपसर्ग लावून होणारे बदल समजावून घेतो व लेखन करतो.	**उपक्रम–** व्यवहारोपयोगी क्रियांना संस्कृत क्रियापदे शोधून विद्यार्थी यादी तयार करतो. **प्रकल्प–** एकाच धातूला सर्व उपसर्ग लावून त्याच्या वर्तमानकाळी व भूतकाळी रूपांचा तक्ता बनवितो.
४) अव्यय	१) अव्यय संकल्पना स्पष्ट करून निर्धारित अव्ययांचे लेखन करवून घेणे. २) अव्ययांचा अर्थ लिहून देणे.	वर्ग	–	अव्यय संकल्पना समजावून घेऊन लेखन करतात. अव्ययांचा अर्थ लिहून घेतात.	**उपक्रम–** शब्दसमूहातील अव्यय ओळखा व लिहा.
५)वाक्यरचना	१) क्रियापद विरहित सोपी वाक्यरचना विद्यार्थ्यांकडून लिहून घेणे. उदा. अहं बाला । एषः छात्रः ।	–	–	क्रियापद विरहित सोपी वाक्यरचना लिहितात.	**वर्गकार्य–** योग्य जोड्या लावा व वाक्य लिहा.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
३) क्रियापद	२) सर्व विभक्त्या व कारकार्थांचा परिचय करवून जास्तीत जास्त विभक्त्या वापरून वाक्य तयार करवून घेणे.	–	–	सर्व विभक्त्या व कारकार्थांचा अर्थ समजावून घेऊन जास्तीत जास्त वाक्य तयार करतात.	वाक्यविस्तार करा. दिलेल्या नामरूपाचे योग्य विभक्ती रूप वापरून वाक्य लिहा.
	३) उपपद विभक्तीचा वापर करून वाक्यरचना समजावून देऊन त्याचे विद्यार्थ्यांकडून लेखन करवून घेणे.			उपपद विभक्तीचा वापर करून वाक्यरचना करतात/लेखन करतात.	**उपक्रम–** –क्रियापदाचा वाक्यात उपयोग करा. –नामाचा वाक्यात उपयोग करा.
	४) वाक्यरचनेच्या तत्त्वानुसार दिलेल्या चित्राचे वर्णन अथवा दिलेल्या विषयावर ४–५ ओळी लेखन करवून घेणे.			दिलेल्या चित्राचे वर्णन लिहितात. दिलेल्या विषयावर माहिती लिहितात.	**उपक्रम–** चित्र पाहा व कंसात दिलेल्या शब्दांचा वापर करून वर्णन करा.
	५) संस्कृतचे खालील नियम समजावून देणे व त्यानुसार लेखनाचा सराव घेणे. –पूर्ण विरामाऐवजी दण्ड देणे . – ।				

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
३) क्रियापद	–अनुस्वाराऐवजी परसवर्णाचे लेखन घंटा – घण्टा । –वाक्यातील शेवटच्या शब्दांत शेवटचे अक्षर अनुनासिक युक्त असल्यास अनुस्वार न देता हलन्त काढणे. एतद् मम गृहम् ।	–	–	–	–
	–वाक्यातल्या कोणत्याही शब्दापुढे स्वराने सुरू होणारा शब्द आल्यास अनुस्वाराऐवजी हलन्त लिहिणे. मात्र पुढे व्यंजन असल्यास अनुस्वारच लिहिणे. १) अहं आगच्छामि । अहम् आगच्छामि । २) अहम् पश्यामि । अहं पश्यामि । ६) क्रियापदांची वर्तमानकाळी व भूतकाळी सर्व रूपे सर्वनामांच्या योग्य ते सर्वनामाच्या रूपांसह लिहून घेणे. (१, ४, ६, १० गण परस्मैपद व आत्मनेपद) उदा. – अहं गच्छामि । आवां गच्छावः । वयं गच्छामः ।	–	–	क्रियापदांची वर्तमानकाळी व भूतकाळी सर्व रूपे सर्वनामांच्या योग्य त्या रूपांसह लिहितात.	– विविध क्रियापदांचा सराव करून घेणे.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
वाक्यरचना	७) व्यवहारोपयोगी आज्ञार्थ रूपे वापरून वाक्यात उपयोग करणे.	–	–	व्यवहारोपयोगी आज्ञार्थ रूपे वाक्यात उपयोजतात.	दिलेल्या धातूचे आज्ञार्थ रूप लिहून वाक्यात उपयोग करा.
	८) कृ . ८ उ.प., अस् २ प.प. या व्यवहारोपयोगी धातूंच्या सिद्धरूपांचा वाक्यात उपयोग करवून घेणे. (वर्तमानकाळ, भूतकाळ, आज्ञार्थ) (रूपे ओळखा या प्रश्नात या धातूंचा समावेश नको)			कृ. ८ उ.प., अस्, २ प.प. या व्यवहारोपयोगी धातूंच्या सिद्धरूपांचे उपयोजन करतील.	वचन व पुरुषांनुसार कृ ८ उ. प. , अस् २ प. प. नुसार वाक्य परिवर्तन करा.
	अभ्यासक्रमानुसार क्रियापदांच्या सर्व रूपांच्या लेखनाचा व वाक्यात उपयोग करवून घेणे.				वचन, काल व पुरुष परिवर्तना–करिता वाक्यांचा सराव देणे. उदा.– 'मम दिनचर्या' याचे 'रमेशस्य दिनचर्या' मध्ये रूपांतर करणे.

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
वाक्यरचना (अनुवाद)	१) दिलेल्या संस्कृत वाक्यांचा माध्यम भाषेतून अनुवाद करवून घेणे/ लेखन करवून घेणे. (संस्कृतातील द्विवचन स्म, ननु, खलु ही अव्यये व अन्य वैशिष्ट्यांचा अनुवादात समावेश अवश्य व्हावा.)	वर्ग	तक्ता	दिलेल्या संस्कृत वाक्यांचा माध्यम भाषेतून अनुवाद करतो/लेखन करतो.	गाभा घटकानुसार उतारे निवडून त्यांचा अनुवाद लिहा. (विषय – पर्यावरण, स्त्री–पुरुष समानता वैज्ञानिक दृष्टिकोन) उदा. कृषी, भारतातील नद्या)
	२) ध्येयवाक्य, बोधवाक्य, सुभाषितवजा पद्यांश, सोपे श्लोक असे क्रमाने देऊन माध्यम भाषेत लेखन (अनुवाद) करवून घेणे.			ध्येयवाक्य, बोधवाक्य, सुभाषितवजा पद्यांश, सोप्या श्लोकांचा माध्यम भाषेत अनुवाद करतील.	**प्रकल्प–** –विविध संस्थांच्या संस्कृत बोधवाक्याचा संग्रह करा.
	३) मराठी वाक्यांचा संस्कृतमध्ये अनुवाद लिहा.			मराठी वाक्यांचा संस्कृतमध्ये अनुवाद लिहा.	**उपक्रम–** –संस्कृत प्रार्थनांचा माध्यम भाषेत अनुवाद करा. (नीतितत्त्वानुसार श्लोकांची निवड करावी.) राष्ट्रभक्ती, सत्य, अहिंसा, समता, बंधुता)
	(संस्कृतात अनुवाद करताना संस्कृत शैलीनुसार क्रियापदे व अव्यये यांच्या विशिष्ट अपेक्षा लक्षात ठेवून व्याकरणशुद्ध अनुवाद लेखनाचा सराव करवून घेणे. उदा. मी तुझ्यावर रागावते – अहं तुभ्यं कुप्यामि ।				

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
६)कालगणना	१) १ ते १२ अंक – चित्रावरून वेळ लिहिणे व लिहून घेणे.	वर्ग	घड्याळ	चित्रावरून वेळ लिहितो.	**उपक्रम–** –स्वतःची दिनचर्या लिहा. –आवडत्या वाहिनीच्या कार्यक्रमाची रूपरेषा लिहा.
७) संख्या	१ ते ५० १) अंकाचे शुद्ध लेखन करवून घेणे. (१ ते ४ लिंगभेदासह)	संस्कृत कोपरा	तक्ता	१ ते ५० संख्यांचे शुद्धलेखन करतो..	**उपक्रम–** –पृष्ठ क्रमांक संस्कृतमध्ये लिहा. –संख्या असलेल्या माध्यम भाषेतील वाक्यांचा संस्कृतमध्ये अनुवाद करा. –उदा. वर्गात २० मुले आहेत.
८) संधी	१) पाठातील स्वरसंधी सोडवा. २) वाक्यरचना करताना संधीचे नियम लक्षात घेऊन लेखन करवून घेणे.	–	–	पाठातील स्वरसंधी सोडवितो. वाक्यरचना संधीचे नियम लक्षात घेऊन लेखन करतो.	–

घटक	कृती/उपक्रम/अध्ययन/अनुभव	भाषा व्यवहाराची क्षेत्रे	साधन सामग्री	व्यावहारिक परिवर्तन/अध्ययन निष्पत्ती	निरंतर मूल्यमापन
९) विशेषण-विशेष्य	१) विशेषण-विशेष्य यांच्या जोड्यांचा लेखनात सराव देणे. २) विशेषण व विशेष्य यांचा योग्य लिंग, वचन, विभक्तीनुसार वाक्यांत उपयोग करवून घेणे.	वर्ग वर्ग	-	विशेषण-विशेष्य जोड्यांच्या लेखनाचा सराव करतात. विशेषण व विशेष्य यांचा योग्य लिंग, वचन, विभक्तीनुसार वाक्यांत उपयोग करतात.	विशेषण-विशेष्य जोड्या लावा. **उपक्रम-** आदर्शाधारित (गाभा घटक, मूल्ये) उतारा देऊन त्यातील विशेषणे शोधणे व दुसरे वाक्य तयार करणे. (आदर्श शिक्षक, आदर्श विद्यार्थी, आदर्श गाव, वरीलपैकी एका विषयावर ५-१० ओळी माहिती लिहा.
१०) अपठित गद्य व पद्य (आकलन)	विद्यार्थिवयोगटानुसार व क्षमतेनुसार गद्य व पद्य उतारे निवडून त्यावर आकलनयुक्त प्रश्नांच्या उत्तरांचे लेखन करवून घेणे. पद्य उताऱ्यांचे सोप्या संस्कृतमध्ये लेखन करवून घेणे.	-	-	विद्यार्थी अपठित गद्य उताऱ्यावरील प्रश्नांची अचूक उत्तरे लिहितात. पद्य उताऱ्यांचे सोप्या संस्कृतमध्ये लेखन करतात.	
	(उतारे निवडताना गाभा, घटक, मूल्ये, कौशल्ये यांचा विचार करण्यात यावा.)				

मूल्यमापन निर्देश

शासनाच्या २० ऑगस्ट २०१२ च्या निर्णयामध्ये विहित केल्यानुसार संस्कृत भाषेतील अध्ययनाच्या प्रगतीचे मूल्यमापन आकारिक व संकलित रीतीने करावयाचे आहे. पाठ्यक्रमाची मांडणी करताना 'निरंतर मूल्यमापन' या रकान्यात सुचविलेल्या कृती सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करताना वापराव्यात. वर्गामध्ये दृढीकरणासाठी, सरावासाठी किंवा प्रश्नपत्रिकेमध्ये पारंपरिक प्रश्नाशिवाय वेगळ्या प्रश्नांचा समावेश अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील चित्रे/छायाचित्रे यावर आधारित प्रश्न, कोडी, शब्दचक्रे यांचा समावेश व्हावा. व्यापार, सापशिडी अशा पारंपरिक खेळातील शब्द–अंक यांचे संस्कृत भाषांतर करून ते सरावासाठी तसेच मूल्यमापनासाठी वापरणे संस्कृत सहशालेय उपक्रमात संस्कृतसाठी रंजक उपक्रम घेऊन त्यातील सहभागाद्वारे मूल्यमापन अशा नावीन्यपूर्ण उपाययोजना अवलंबणे शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांच्याही दृष्टीने आनंददायक ठरेल.

प्रश्नप्रकारानुसार भारांश पुढीलप्रमाणे सुचविला आहे.

भारांश

वस्तुनिष्ठ – २०%

लघुत्तरी – ६०%

दीर्घोत्तरी – २०%

	आकारिक मूल्यमापन	**संकलित मूल्यमापन**						
		लेखी	+	तोंडी=	एकूण			**एकूण**
१) संयुक्त संस्कृत	२०– तंत्रानुसार विभागणी	२५	+	०५	=	३०		५०
२) संपूर्ण संस्कृत	४० –तंत्रानुसार विभागणी	५०	+	१०	=	६०		१००